**नि.फौ.ख.क्र. ४३/२००८**

 शासन वि. रफिक इमानदार.

**नि.क्र.९२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५</u>**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

**नाव : सुचिता सुधिर बलवान,**
वय : ४६ वर्षे, व्यवसाय: लिपीक,
मलकापुर नगरपरिषद, मलकापुर, ता. कराड, जि.सातारा.

**<u>सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे यांचे मार्फत–</u>**

१. सन २००७ साली मी संगणक ऑपरेटर म्हणुन ग्रामपंचायत मलकापुर येथे कार्यरत होते. मी सन २००८ पर्यंत संगणक ऑपरेटर म्हणुन कामकाज पाहिले. मी सरपंच व ग्रामसेवक यांचे सांगणेप्रमाणे ८अ उतारा, रहिवासी दाखले, वीज कनेक्शन दाखले, व्यवसाय दाखले जारी करीत होते. सदर दस्तऐवजांपैकी रहिवासी दाखल्यावर सरपंच यांची सही असायची. तसेच नमुना ८अ उतारा व इतर दाखल्यावर ग्रामसेवक यांची सही असायची. मी आरोपींना ओळखते. आरोपी मलकापुर परिसरातील रहिवासी आहेत. आज न्यायालयामध्ये आरोपी क्र.१ व २ उपस्थित असुन सलाऊद्दीन आरोपी क्र. १ याने आज पांढऱ्या रंगाचा शर्ट परिधान केला आहे. तसेच आरोपी क्र.२ रफिक इनामदार याने आज पिस्ता रंगाचा शर्ट परिधान केला आहे. सल्लाऊद्दीन नुरुद्दीन मरसल यांनी ग्रामपंचायतीचा बनावट मिळकत उतारा राजेंद्र सुरी या पतसंस्थेला दिला होता. त्यावरील सहया या आमच्या नव्हत्या. बनावट होत्या. ग्रामपंचायतीची फसवणुक केली होती. त्यासंदर्भात तत्कालीन सरपंची मनोहर शिंदे यांनी पोलीस ठाण्यात खबर दिली होती.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**
**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.एस.एस.निकम यांचेमार्फत सुरु</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/१२/२००७ रोजी कराड शहर पोलीस ठाण्यातील पोलीसांनी माझ्या सांगणेप्रमाणे माझा जबाब नोंदविला आहे. सदर जबाब नोंदवितेवेळी मी पोलीसांना आरोपी मलकापुर येथील रहिवासी असलेने मी त्यांना ओळखते ही बाब सांगितली नव्हती. सदर जबाब नोंदवितेवेळी मी पोलीसांना आरोपी क्र. २ याने बनावट उतारा तयार करुन सदर उतारा राजेंद्र सुरी पतसंस्थेला दिला होता असे सांगितले होते. आता मला दि.०९/१२/२००७ रोजी पोलीसांनी नोंदविलेला जबाब दाखविला. तो मी वाचुन पाहिला. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये सदर बाब नमुद नाही.

 शासन वि. रफिक इमानदार.

**नि.क्र.९२**

हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी पोलीसांना जबाब नोंदवितेवेळी सांगितली नव्हती त्यामुळे ती माझ्या पोलीस जबाबात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ याने बनावट उतारा तयार करुन सदर उतारा राजेंद्र सुरी पतसंस्थेला दिला होता हे मी खोट सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ हे माझे नातेवाईक किंवा ओळखीचे इसम नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी आरोपींना पहिल्यांदा न्यायालयामध्ये पाहत आहे. यापुर्वी आरोपींना पाहण्याचा योग आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ८अ उता–यार केवळ ग्रामसेवक यांची सही असते. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र सुरी पतसंस्थेतील विवादित कर्ज प्रकरणाची मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ इतर लोकांच्याकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस जबाबामध्ये मजकूर नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आजदेखील मला राजेंद्र सुरी पतसंस्थेतील विवादित कर्ज प्रकरणाची व उताऱ्याची व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तत्कालीन सरपंच हे सद्या मलकापुर नगरपरीषदेचे उपनगराध्यक्ष आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्याकडुन माहिती घेवुन त्याआधारे साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमुद मी आरोपींना ओळखते, आरोपी न्यायालयात हजर आहेत, राजेंद्र सुरी पतसंस्थेला विवादित उतारा दिला, त्यावर आमच्या सहया नाहीत, तो बनावट आहे, सदर उतारा सलाऊद्दीन याने तयार केला हा संपुर्ण मजकूर खोटा आहे.

**सरतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.07.21 16:51:50 +0530

दि. २१/०७/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
(कोर्ट क्र.०४)